संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१७०/२०२१
नि.क्रं. १०/सी

**<u>सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्रं. २ शपथेवर कथन करतो की</u>-**

माझे नाव - प्रकाश पांडुरंग चव्हाण
वय - ५१ वर्षे, व्यवसाय - शेती
राहणार - गारगोटी, ता:भुदरगड, जि: कोल्हापूर

**<u>सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस.बी.कांबळे यांचे मार्फत -</u>**

**१.** दि.२१/०८/२०२१ रोजी मी राज्य उत्पादक शुल्क यांचे सोबत तळगाव ता.राधानगरी येथे गेलो होतो. अवैध दारु विक्रीचे ठिकाणी छापा टाकणेकरीता पंच म्हणून गेलो होतो. तेथे एक ईसम आपले कब्जेत गावठी हातभट्टीची दारू घेवून बसलेला मिळून आला. त्याचे कब्जेत एका काळया रबरी इनर मध्ये २८ ली. गावठी हातभट्टी, एक रिकामा प्लॅस्टीक मग आणि पाच काचेचे ग्लास मिळून आले. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव बबन शंकर गुरव असे सांगितले. दुय्यम निरीक्षक यांनी सदरील मुद्देमालमधून १८० मिलीच्या दोन बाटल्या सॅम्पल काढले. त्यावर सहीचा कागद लावून सिल केले. सर्व मुद्देमाल जप्त करून माझे समक्ष पंचनामा केला. आता मला तो पंचनामा दाखविणेत आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून अनु. क्र.१ वर माझी सही आहे. पंचनामेस **नि.११/PW2** देण्यात येते. आरोपी यांस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ वकील श्री.यु.एम.मानकर यांचे मार्फत -</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मी राज्य उत्पादन शुल्कच्या अनेक कामामध्ये पंच म्हणून काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी १९९५ पासून राज्य उत्पादक शुल्क, राधानगरी, कागल आणि गारगोटी यांच्या अनेक केसेस मध्ये पंच म्हणून काम केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज न्यायालयात मुद्देमाल हजर नाही. पंचनामेवर आरोपीची सही घेतलेली नाही तसेच आरोपीला पंचनामेची प्रत माझे समक्ष दिलेली नाही. पंचनामा करतेवेळी घटनास्थळ कोणाच्या मालकीचे होते याची मी खात्री केलेली नाही. घटनास्थळाच्या आजुबाजुच्या जागेच्या मालकीची माहिती मी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटा मजकूर सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादक शुल्क कार्यालयास मी गेली ३० वर्षे मानधन म्हणून पंच म्हणून काम करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी राज्य उत्पादक शुल्क कार्यालयाचा नेहमीचा पंच असून त्यांस मदत करण्याकरीता आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

राधानगरी (एन. पी. काकडे)

दिनांक.१३/११/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.